# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार
यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व,
जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र. ४४५ /२०२३ दिनांक २९/१२/२०२३

**गुजरात/राजस्थान/मध्यप्रदेश राज्यातील आरोपीतांना अटक करुन दिल्ली येथील कार चोरीचे एकूण ०८ गुन्हे व मिरारोड पो. ठाण्यात फसवणुक व ठकवणुकचा १ गुन्हा उघडकीस आणुन एकुण २,४३,३६,२००/-रुपये किमंतीचे ०८ चोरीच्या कार, गुन्हयाकामी वापरलेले मोबाईल फोन, बनावट कार चाव्या, बनावट आरसी बुक बनविण्याचे साहीत्य हस्तगत करण्यात मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश**

फिर्यादी हर्ष महेशभाई दोशी, वय-३० वर्षे, व्यवसाय-हॉटेल व्यवसाय, रा.फ्लॅट नं. ३६, रावलगांव बिल्डींग नं. ०७, जे. बी. नगर सुरभी हॉटेल जवळ, अंधेरी पुर्व, मुंबई याची आरोपीत यानी आपसांत संगनमत करुन आर्थीक फसवणुक व ठकवणुक केलेबाबत मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा नोद क्रमांक I ४०५/२०२३ भादविसक ४२०, ४६५, ४६७, ४७१, ४११, १२०(ब) प्रमाणे दिनांक ०६.१२.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचा तपास हितेंद्र विचारे, पोलीस उप निरीक्षक, मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण कक्ष, मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय हे करीत आहेत.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये मिळुन आलेल्या वाहनाचे क्रमांक, चेसीस क्रमांक, इंजिन क्रमांक यांची नाकाबंधी ॲपमधुन माहीती प्राप्त करुन नमुद वाहनाचे मालकाशी तपास पथकाने संपर्क साधला असता त्यांनी त्यांचे वाहन आपलेकडेच असल्याचे सांगितल्याने ताब्यात घेतलेल्या वाहनाबाबत संशय आल्याने नमुद वाहने टोयाटो व हुंडाई कंपनीचे शोरुममध्ये पाठवुन त्यांचेकडील गुगल ट्रकींग सिस्टीम वरुन VIN (Vehicle Verification No) शोधुन मुळ वाहन क्रमांक, चेसीस क्रमांक, इंजिन क्रमांक यांची माहीती घेतलेनंतर मुळ वाहन मालकांना त्याचे संपर्क क्रमांकावर संपर्क करुन वाहनाबाबत माहीती घेतली असता त्यांनी त्यांची नमुद वाहने दिल्ली येथुन चोरी गेल्याची माहीती दिली. त्यावरुन तपासात दिल्ली येथे एकुण वेगवेगळे पोलीस ठाण्यात ०८ गुन्हे चोरीचे दाखल असल्याची माहीती मिळुन आली आहे.

नमुद अटक आरोपी व पाहीजेत आरोपी यांनी आपसांत कट करुन संघटीतरित्या जप्त वाहने चोरीची आहेत हे माहीत असताना त्या खरेदी करुन त्याचे आरसी बुक, चेसीस क्रमांक, कार विमा पॉलीसी, चावी असे बनावट बनवुन त्यातील वाहनाची विक्री केली तसेच काही वाहने विक्री करणेसाठी स्वतःकडे ठेवुन घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे तसेच त्यांनी अशा प्रकारचे गुन्हे वेगवेगळया राज्यात केल्याची माहीती प्राप्त झाली आहे.

सदर गुन्हयाचे तपासात खालील प्रमाणे आरोपीत यांना अटक करण्यात आलेली असुन ते सद्या न्यायालयीन कोठडी रिमांड मध्ये आहेत.

१) मिलनराजसिंह ऊर्फ बापु सुरेशकुमार चौहाण, वय-३५ वर्षे,व्यवसाय-जुनी कार खरेदी-विक्री रा.प्लॉट क्रमांक ६५४/१, सेक्टर क्र.४ सी, गांधी नगर, गुजरात

२) तारीफहुसेन इक्बाल खान, वय-३३ वर्षे, व्यवसाय- जुनी कार खरेदी-विक्री सद्या रा. रुम क्र. २०३, वॉन टॉवर,८० फुट रोड, जोटवाडा, जयपुर, राजस्थान मुळ रा. गांव मदनसर, पोष्ट भिमसर, ता.मुंडवा, जि.झुनझुनु राज्य-राजस्थान

३) ईर्शाद अकबरभाई अजमेरी, वय-३९ वर्षे धंदा-जुनी कार खरेदी-विक्री सद्या रा. ३०४, स्वागत अपार्टमेन्ट, सहापुर, सुरत, गुजरात मुळ रा.डी/२,फिर्दोस प्लाट, खानपुर, अहमदाबाद, गुजरात

४) वसीम अल्ताफ पठाण, वय-३७ वर्षे धंदा-जुनी कार खरेदी-विक्री रा.रुम क्र.५७, गांधी नगर,आगर रोड,जिल्हा उज्जैन, मध्यप्रदेश

५) शाहीद आयुब खान, वय-३४ वर्षे धंदा-जुनी कार खरेदी-विक्री रा.चंबल सागरी कॉलनी,ऊर्दु शाळेच्या जवळ, नागदा, जिल्हा उज्जैन,मध्यप्रदेश

६) नबीजान ऊर्फ अल्लाबक्ष शौकतअली अन्सारी, वय-४७ वर्षे, धंदा-नंबर प्लेट बनविणे, रा.बॉल्क नं.०३, रुम नं.१०, राजीव गांधी नगर, धारावी, मुंबई

## गुन्हयाचे तपासात जप्त चोरीची वाहने :-

| | | |
|---|---|---|
| ०१) | २४,००,०००/- | रुपये किमतीची एक हुडाई क्रेटा कंपनीची कार (**कंपनीचे शोरुममध्ये वाहनाचे मुळ क्र. DL-01-CAF-0319 असा आहे.** |
| ०२) | १५,००,०००/- | रुपये किमतीची एक टोयाटा कंपनीची इंनिव्हा क्रिस्टा कार (**कंपनीचे शोरुममध्ये सदर वाहनाचे मुळ क्र.**DL-14-CE-0362 **असा आहे.** |
| ०३) | ४०,००,०००/- | रुपये किमतीची सफेद रंगाची डिजेल टोयाटो फॅच्युनर मॉडेलची कार (**कंपनीचे शोरुममध्ये सदर वाहनाचे मुळ क्र.** UK-07-DR-2600 **असा आहे.** |
| ०४) | ४०,००,०००/- | रुपये किमतीची पर्ल ब्ल्यु रंगाची एक टोयाटो फॅच्युनर सिगमा कार (**कंपनीचे शोरुममध्ये सदर वाहनाचे मुळ क्रमांक** DL-3CCT-6109 **असा आहे.** |
| ०५) | १८,२१,०००/- | रुपये एक सफेद रंगाची टोयाटा कंपनीची इंनिव्हा क्रिस्टा कार (**कंपनीचे शोरुममध्ये सदर वाहनाचे मुळ क्रमांक** BR-01-PM-5930 **असा आहे.** |
| ०६) | ४०,००,०००/- | रुपये काळया रंगाची टोयाटो फॅच्युनर सिगमा कार (**कंपनीचे शोरुममध्ये सदरचे वाहनाचा क्र. HR-72-H-5749 असा आहे.** |
| ०७) | ४०,००,०००/- | रुपये किमंतीची सफेद रंगाची टोयाटो फॅच्युनर सिगमा कार (**कंपनीचे शोरुममध्ये सदरचे वाहनाचा क्र.** UP-25-DB-1122 **असा आहे.** |
| ०८) | २५,००,०००/- | रुपये किमतीची ब्रॉन्स मेटल रंगाची टोयाटा कंपनीची इंनिव्हा क्रिस्टा कार (**कंपनीचे शोरुममध्ये सदरचे वाहनाचा क्र.** DL-10-CL-5960 **असा आहे.** |
| | २,४२,२१,०००/- | एकुण रक्कम |

तरी वरील प्रमाणे एकुण २,४२,२१,०००/- किमंतीची एकुण ८ वाहने जप्त करण्यात आले असुन दिल्ली पोलीस आयुक्तालयातील खालीलप्रमाणे ८ चोरीचे दाखल गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

| | |
|---|---|
| ०१) | राजेंद्र नगर पोलीस स्टेशन, जिल्हा-क्राईम ब्रॉन्च, दिल्ली गुन्हा नोद क्र.०२४५१६/२०२३ भादविसंक ३७९ |
| ०२) | विवेक विहार पोलीस स्टेशन, शहाद्रा, दिल्ली गुनोक्र. ०२५६८०/२०२३ भादविसक ३७९ |
| ०३) | शाहीन बाग साऊथ ईस्ट पोलीस स्टेशन, दिल्ली गुनोक्र. ०३०७३३/२०२३ भादविसक ३७९ |
| ०४) | अमर कॉलनी, साऊथ ईस्ट पोलीस स्टेशन, दिल्ली गुन्हा नोद क्रमांक ०२८३१९/२०२३ भादविसक ३७९ |
| ०५) | मधु विहार पुर्व जिल्हा पोलीस स्टेशन, दिल्ली गुन्हा नोद क्र. ०२०९९५/२०२३ भादविसक ३७९ |
| ०६) | मालविया नगर साऊथ जिल्हा पोलीस स्टेशन, दिल्ली गुन्हा नोद क्र. ०३३७६९/२०२३ भादविसक ३७९ |
| ०७) | साकेत साऊथ जिल्हा पोलीस स्टेशन, दिल्ली गुन्हा नोद क्रमांक ०२६०७२/२०२३ भादविसक ३७९ |
| ०८) | के. एम. पुर साऊथ जिल्हा पोलीस स्टेशन, दिल्ली गुन्हा नोद क्रमांक ०३२०३२/२०२३ भादविसक ३७९ |

सदरची कारवाई श्री.अविनाश अंबुरे मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री.मदन बल्लाळ मा.सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, सपोनिरी. दत्तात्रय सरक, सपोनिरी.नितीन बेंद्रे, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, सपोउपनिरी.श्रीमंत जेधे, पोहवा. मनोहर तावरे, पोहवा.आसिफ मुल्ला, पोहवा.महेश वेल्हे, पोहवा.राजाराम काळे, पोहवा.राजवीरसिंग संधु, पोहवा. गोविंद केन्द्रे, पोहवा.प्रविणराज पवार,पोहवा.अनिल नागरे,पोहवा.सतिष जगताप,पोहवा.संग्राम गायकवाड,पोशि.हनुमंत सुर्यवंशी, पोहवा. शिवाजी पाटील, मसुब. सचिन चौधरी, सफौ.संतोष चव्हाण यांनी केलेली आहे.


मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा,
मिरा-भाईंदर, वसई-विरार, पोलीस आयुक्तालय